Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे




“विकास व लोककल्याणाचा हिंदवी विचारांचा भगवा युवा झंझावात”
(पान २ वर)

। बुधवार, दि. २० मे २०२६ । वर्ष १ । अंक ४५ । पाने २। DIGITAL EDITION

Selected

## इराणवर पुन्हा लष्करी हल्ला करावा लागू शकतो

**मुंबई:** अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षावर अद्याप तोडगा निघालेला नाही. पाकिस्तानमध्ये फिस्कटलेल्या चर्चेच्या पहिल्या फेरीनंतर उभय देशात पुन्हा चर्चा झालेली नाही. इराणकडून देण्यात येणारे प्रस्ताव डोनाल्ड ट्रम्प धुडकावून लावत आहेत. अशात इराणवर पुन्हा एकदा लष्करी हल्ला करावा लागू शकतो, असे संकेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी दिले आहेत. इराणवर हल्ला करण्याचा निर्णय घेण्यापासून अवघा एक तास दूर होतो, असाही खुलासा ट्रम्प यांनी केला. आखाती देशांच्या विनंतीमुळे नियोजित हल्ला पुढे ढकलल्याचे ट्रम्प म्हणाले.डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आजच इराणवर कारवाई करण्याचा विचार होता असा खुलासा त्यांनी केला.

### ९ जूनला दसरा चौकातून भव्य मोर्चाची घोषणा

# शक्तीपीठ महामार्गाविरोधात सर्वपक्षीय वज्रमुठ!

## ७८ गावांतील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध, सरकारसमोर नवे आव्हान

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी समजल्या जाणाऱ्या प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाविरोधात कोल्हापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला असून आता या आंदोलनाला सर्वपक्षीय स्वरूप प्राप्त झाले आहे.७८ गावांचा या महामार्गाच्या नव्या संरेखनात समावेश झाल्याने हजारो शेतकऱ्यांच्या शेती आणि बागायती जमिनी धोक्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.**

या पार्श्वभूमीवर ९ जून रोजी कोल्हापुरातील दसरा चौकातून भव्य मोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली असून त्यामुळे राज्य सरकारची कोंडी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. कसबा बावडा येथे आयोजित करण्यात आलेल्या सर्वपक्षीय शेतकरी मेळाव्यात “गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग रद्द करा” या घोषणेखाली शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध राजकीय पक्षांचे नेते मोठ्या संख्येने एकत्र आले होते. या मेळाव्यात सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली तसेच महामार्गाचा प्रस्ताव तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली. या मेळाव्यास माजी खासदार राजू शेट्टी, काँग्रेसचे



आमदार सतेज पाटील, शिक्षक आमदार जयंत आसगावकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सहसंपर्कप्रमुख विजय देवणे, माजी आमदार के.पी.पाटील, ए.वाय. पाटील, राजू बाबा आवळे, राजीव आवळे, संपतबापू पाटील यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व हजारो शेतकरी उपस्थित होते. सर्वच नेत्यांनी एकमुखाने शक्तीपीठ महामार्गाच्या नव्या संरेखनाला विरोध दर्शवत सरकारवर टीकेची झोड उठवली. मेळाव्यात बोलताना आमदार सतेज पाटील यांनी सरकारला थेट इशारा दिला. “शक्तीपीठ महामार्ग रद्द झालाच पाहिजे. यासाठी आता रस्त्यावरची आणि कायदेशीर अशा दोन्ही पातळ्यांवर लढाई उभी केली जाईल. प्रसंगी अंगावर लाठी खाऊ, जेलमध्ये जाऊ; पण शेतकऱ्यांच्या जमिनी वाचवण्यासाठी मागे हटणार नाही,” असे ते म्हणाले. तसेच सरकारने पोलिसी बळाचा वापर करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल आणि त्याला सरकारच जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, नव्या अधिसूचनेनुसार प्रस्तावित महामार्गामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर सुपीक व बागायती जमीन संपादित केली जाणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. अनेक गावांतील नागरिकांनी या प्रकल्पामुळे शेती, पाणी, पर्यावरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली आहे.

### आगामी काळात आंदोलन तीव्र होण्याची चिन्हे

मेळाव्यात २५ मेपूर्वी शासनाकडे जास्तीत जास्त हरकती नोंदवण्याचे आवाहनही करण्यात आले. आंदोलन अधिक तीव्र करण्यासाठी गावागावांत बैठका, जनजागृती मोहीम आणि संघटनात्मक तयारी सुरू करण्यात आली आहे. ९ जूनच्या मोर्चात जिल्हाभरातील हजारो शेतकरी सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. शक्तीपीठ महामार्गाच्या मुद्द्यावर आता कोल्हापुरात राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले असून आगामी काळात हे आंदोलन आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.


जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## गोलाणी मार्केट परिसरात विजेच्या डीपीला आग!

### शॉर्टसर्किटमुळे लागली आग

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव शहरातील गोलाणी मार्केट परिसरात आज दुपारच्या सुमारास विजेच्या डीपीला आग लागल्याची घटना घडली. अग्निशामक दलाच्या ऑफिस क्रमांक ०१ च्या बाजूलाच असलेल्या डीपीमध्ये तापमान वाढल्याने शॉर्टसर्किट झाले आणि काही क्षणांतच परिसरात आग पसरली. मिळालेल्या माहितीनुसार, डीपीजवळ मोठ्या प्रमाणावर कोरडे गवत साचलेले असल्याने आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशामक दलाच्या जवानांनी पंपाच्या सहाय्याने आग विझविण्याचे काम हाती घेतले. जवानांच्या तत्परतेमुळे आग वेळीच नियंत्रणात आली आणि मोठा अनर्थ टळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून परिसरातील कोरडे गवत व काही साहित्य जळाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. आग विझवल्यानंतर परिसर सुरक्षित करण्यात आला. दरम्यान, वाढते



तापमान, विजेच्या डीपीजवळील कोरडे गवत आणि दुर्लक्षित विद्युत यंत्रणा यामुळे अशा घटनांची शक्यता वाढत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित विभागाने अशा धोकादायक ठिकाणांची तातडीने पाहणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

### घटनेत कोणतीही जीवितहानी झाली

अग्निशामक दलाच्या जवानांनी पंपाच्या सहाय्याने आग विझविण्याचे काम हाती घेतले. जवानांच्या तत्परतेमुळे आग वेळीच नियंत्रणात आली आणि मोठा अनर्थ टळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून परिसरातील कोरडे गवत व काही साहित्य जळाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

## राज्य प्रशासनात मोठे फेरबदल: फडणवीसांचा कडक निर्णय, मुंढेंकडे एपडीएची धुरा!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्याच्या प्रशासनात पुन्हा एकदा मोठे फेरबदल करण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने काही महत्त्वाच्या विभागांमध्ये कडक आणि निर्णायक बदल केले आहेत. विशेषतः अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाच्या नेतृत्वात झालेल्या बदलामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. शिस्तप्रिय आणि कठोर निर्णयक्षम अधिकारी म्हणून ओळख असलेले २००५ बॅचचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले असून तुकाराम मुंढे यांनी तात्काळ पदभार स्वीकारावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. आतापर्यंत FDA आयुक्त म्हणून कार्यरत असलेले श्रीधर डुबे यांची आता मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (SRA) मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील संवेदनशील आणि महत्त्वाच्या विभागांपैकी एक मानल्या जाणाऱ्या अन्न व औषध प्रशासन विभागाची जबाबदारी तुकाराम मुंढे यांच्याकडे सोपवण्यात आल्याने प्रशासनात नव्या कार्यपद्धतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.
मुंढे यांनी यापूर्वी विविध विभागांमध्ये काम करताना कठोर शिस्त, पारदर्शक कारभार आणि भ्रष्टाचाराविरोधातील भूमिकेमुळे स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे FDA विभागातील कारभार अधिक कडक आणि परिणामकारक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कान्हुराज बगाटे यांची महामुंबई मेट्रो संचलन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील महत्त्वाच्या शहरी वाहतूक प्रकल्पांपैकी असलेल्या मेट्रो व्यवस्थापनाची जबाबदारी आता त्यांच्याकडे असणार आहे. तसेच राज्य कामगार विमा योजना आयुक्त आर. एस. चव्हाण यांच्याकडे हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. औषध निर्मिती आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या दृष्टीने हा विभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

### FDA विभागाकडे विशेष लक्ष लागले

याशिवाय बाबासाहेब बेलदार यांची धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण विकास आणि स्थानिक प्रशासनाच्या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान, नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरण, औषध नियंत्रण, अन्न सुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित विविध मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर FDA विभागाकडे विशेष लक्ष लागलेले असतानाच तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्याने या विभागात मोठ्या प्रमाणात शिस्त आणि कार्यक्षमता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जळगाव विधानपरिषद निवडणुकीचा बिगुल

### ६३० सदस्य बजावणार मतदानाचा हक्क

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणूक २०२६ चा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला असून जळगाव जिल्ह्यात निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी अधिकृत घोषणा केल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात आचारसंहिता लागू करण्यात आली असून राजकीय हालचालींना वेग आला आहे. जळगाव स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी होणाऱ्या या निवडणुकीत जळगाव महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतीतील निवडून आलेले सदस्य मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्ह्यातील एकूण ६३० मतदार या निवडणुकीत सहभागी होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार २५ मे रोजी अधिसूचना जारी करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत २ जूनपर्यंत राहणार असून ३ जून रोजी अर्जांची छाननी केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ६ जून निश्चित करण्यात आली आहे. तर प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेदरम्यान पार पडणार आहे. मतमोजणी २२ जून रोजी होणार



असून त्यानंतर निकाल जाहीर करण्यात येणार आहे. नामनिर्देशन पत्रे जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण ७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया मतपत्रिकेद्वारे पार पडणार असून मतदारांना पसंतीक्रमानुसार मतदान करता येणार आहे. या निवडणुकीसाठी जळगाव महानगरपालिका, १५ नगरपरिषदा आणि ४ नगरपंचायतीतील निर्वाचित तसेच स्वीकृत सदस्य मतदानासाठी पात्र ठरणार आहेत. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत पार पडावी यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रांवर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. सदर निवडणुकीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी अनामत रक्कम १० हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे.

## सार्वजनिक ठिकाणी दारू पिणाऱ्यांवर कारवाई

### जळगाव पोलिसांची धडक मोहीम

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहरातील सार्वजनिक ठिकाणी, भर रस्त्यावर आणि वाईन शॉपच्या परिसरात उघडपणे दारू पिऊन नागरिकांना त्रास देणाऱ्या तळीरामांविरोधात जळगाव पोलिसांनी मोठी धडक मोहीम सुरू केली आहे. विशेष म्हणजे या कारवाईचे नेतृत्व स्वतः जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी करत अचानक शहरात गस्त घालत मद्यपींवर कारवाईचा बडगा उगारला. पोलीस अधीक्षक स्वतः कारवाईसाठी रस्त्यावर उतरल्याचे पाहताच अनेक तळीरामांची चांगलीच पळापळ उडाली. शहरातील अनेक वाईन शॉप्स, बिअर शॉपी आणि मुख्य रस्त्यांच्या कडेला सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे सातत्याने येत होत्या. विशेषतः महिला, विद्यार्थिनी, लहान मुले आणि सर्वसामान्य नागरिकांना या प्रकारामुळे मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत होता. काही ठिकाणी दारूच्या नशेत गोंधळ घालणे, महिलांवर अश्लील टिप्पणी करणे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण करणे असे प्रकार वाढल्याने पोलिसांनी कठोर भूमिका घेतली. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी स्वतः पथकासह शहरातील विविध भागात अचानक धाडसत्र सुरू केले. वाईन शॉपच्या आडोशाला सुरू असलेल्या बेकायदेशीर अड्ड्यांवर छापे टाकत सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्या अनेकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. काही मद्यपींना जागेवरच दंडात्मक कारवाईचा सामना करावा लागला, तर काहींविरुद्ध कायदेशीर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अचानक झालेल्या या कारवाईमुळे रस्त्यावर उघडपणे



दारूची पार्टी करणाऱ्या तळीरामांचे धाबे दणाणले. अनेक जणांनी घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत कारवाई केली. या धडक मोहिमेमुळे नियमांचे उल्लंघन करून व्यवसाय करणाऱ्या काही वाईन शॉप चालकांमध्येही खळबळ उडाली आहे. “सार्वजनिक शांतता, नागरिकांची सुरक्षितता आणि महिलांचा सन्मान याला जळगाव पोलिसांचे सर्वोच्च प्राधान्य आहे. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करून उपद्रव माजवणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. ही मोहीम पुढेही अधिक तीव्र स्वरूपात सुरू राहील,” असा स्पष्ट इशारा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिला.

### कारवाईचे शहरातील नागरिकांकडून स्वागत

अचानक झालेल्या या कारवाईमुळे रस्त्यावर उघडपणे दारूची पार्टी करणाऱ्या तळीरामांचे धाबे दणाणले. अनेक जणांनी घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत कारवाई केली. दरम्यान, पोलिसांच्या या कारवाईचे शहरातील नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी पोलिसांच्या धाडसी भूमिकेचे कौतुक करत अशा मोहिमा नियमित राबविण्याची मागणी केली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## पारोळ्यात “सिडबॉल्स कॅम्पेन 2026-27” नियोजन बैठक उत्साहात

### पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रमांचे नियोजन; नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी

जन सम्राट टाईम्स

**पारोळा :** पर्यावरण संवर्धन आणि वृक्षसंवर्धनाच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या “सिडबॉल्स कॅम्पेन २०२६-२७” या उपक्रमाची नियोजन बैठक १८ मे रोजी एनईएस गर्ल्स हायस्कूल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीस शैक्षणिक, सामाजिक आणि पर्यावरण क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, स्वयंसेवक तसेच पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीत आगामी तीन महिन्यांसाठी विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे सविस्तर नियोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून सिडबॉल्स निर्मिती, सिडबॉल्स कार्यशाळा, पशु-पक्ष्यांसाठी पाणवठे तयार




करणे, महिलांसाठी “माझी परसबाग” स्पर्धा, वृक्षारोपण, पंचवटी निर्मिती तसेच पर्यावरण जनजागृती अभियान राबविण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.या अभियानासाठी आवश्यक वृक्षरोपे कल्पना फाउंडेशन आणि डॉ. सचिन करोडपती यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. समितीच्या वतीने विविध शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.या अभियानात डॉ. सुदर्शन जैन, रवींद्र निकम, कल्पेश नावरकर, मांगेश पवार, धर्मेंद्र शिंपी, भरत जाधव, श्री. नेरपगार आणि श्री. चौधरी सर आदी मान्यवर सहकार्य करणार असल्याचे सांगण्यात आले.“सिडबॉल्स कॅम्पेन”चे हे सलग आठवे वर्ष असून हा उपक्रम सर्वांसाठी खुला असल्याचे आयोजकांनी सांगितले. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून गावाच्या विकासासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.दरम्यान, पारोळा नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनीदेखील या अभियानाला संपूर्ण सहकार्य देण्याची ग्वाही दिली. यंदा अधिक व्यापक स्वरूपात पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येणार असून नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे त्यांनी नमूद केले. मुख्य समन्वयक राहुल निकम यांनी अभियानाची माहिती देत, पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने प्रत्यक्ष कृतीतून योगदान देण्याची गरज असल्याचे सांगितले. बैठकीत उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्न

### समितीच्या वतीने विविध शाळांना भेटी

विद्यार्थ्यांकडून सिडबॉल्स निर्मिती, सिडबॉल्सपंचवटी निर्मिती तसेच पर्यावरण जनजागृती अभियान राबविण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.या अभियानासाठी आवश्यक वृक्षरोपे कल्पना फाउंडेशन आणि डॉ. सचिन करोडपती यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. समितीच्या वतीने विविध शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

✓ » Selected

## कोकणात मोबाईल नेटवर्कची समस्या

**मुंबई| प्रतिनिधी :** रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दुर्गम व डोंगराळ भागांमध्ये मोबाईल नेटवर्कच्या समस्यांबाबत जिल्हाधिकारी, भारत संचार निगमचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त सहभागातून तालुकानिहाय नव्याने सर्वेक्षण करण्यात यावे, तसेच त्यावर आधारित कृती आराखडा सादर करावा, असे निर्देश इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोबाईल नेटवर्क आणि ४जी सुविधांबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस चिपळूणचे आमदार शेखर निकम, महाआयटीच्या संचालक भुवनेश्वरी एस., महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर, विभागाचे अवर सचिव योगेश गोसावी तसेच दूरदृष्य प्रणालीद्वारे संबंधित निवासी जिल्हाधिकारी, भारत संचार निगमचे कोल्हापूर विभागाचे अधिकारी अमित पाटील उपस्थित होते.

# धुळेतील अतिक्रमण कारवाई थांबवा; गरीबांचे पुनर्वसन करा

## शाह फारूक अन्वर यांचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

**धुळे** | प्रतिनिधी: धुळे जिल्हा प्रशासन आणि धुळे महानगरपालिकेकडून सुरू असलेल्या अतिक्रमण निष्कासन मोहिमेविरोधात माजी आमदार शाह फारूक अन्वर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शासनाच्या आदेशाला धाब्यावर बसवत गरीब नागरिकांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप करत त्यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन सादर करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, धुळे शहरातील देवपूर सुशी नाला परिसरासह स्टेशन रोड आणि इतर भागांमध्ये प्रशासनाकडून अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र, ही कारवाई शासनाच्या २५ मार्च २०२६ च्या धोरणाच्या विरोधात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. गेल्या ५० ते ७० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे सर्वेक्षण न करता आणि त्यांचे पुनर्वसन न करता कारवाई केली जात असल्याने शेकडो कुटुंबे बेघर झाली आहेत. “ऐन पावसाळ्याच्या तोंडावर गरीब नागरिकांना नोटिसा देऊन घरे हटविण्याची मोहीम राबवली जात आहे.

यामुळे दलित, मुस्लिम, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजातील नागरिक उघड्यावर आले असून त्यांच्यासमोर निवाऱ्याचा



गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे,” असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. माजी आमदार शाह फारूक अन्वर यांनी प्रशासनावर शासन निर्णयाची पायमल्ली केल्याचा आरोप करत, पुनर्वसनाशिवाय कोणतीही अतिक्रमण कारवाई करू नये, अशी मागणी केली आहे. शासनाच्या मालकीच्या लगतच्या जागांवर किंवा त्याच ठिकाणी बाधित नागरिकांचे तातडीने पुनर्वसन करण्यात यावे, अशीही मागणी त्यांनी केली आहे. या मोहिमेमुळे राज्य सरकारची प्रतिमा मलीन होत असल्याचे सांगत, धुळे जिल्हा प्रशासन आणि महानगरपालिकेला तात्काळ कारवाई थांबविण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे. दरम्यान, अतिक्रमण कारवाईमुळे प्रभावित झालेल्या नागरिकांमध्ये मोठी नाराजी असून, पुनर्वसनाशिवाय कारवाई होऊ नये, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांकडूनही केली जात आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील संघर्षामुळे हा प्रश्न अधिकच तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

### पुनर्वसनाशिवाय अतिक्रमण कारवाई करू नये

धुळे शहरातील देवपूर सुशी नाला परिसरासह स्टेशन रोड आणि इतर भागांमध्ये प्रशासनाकडून अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र, ही कारवाई शासनाच्या २५ मार्च २०२६ च्या धोरणाच्या विरोधात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात रिक्षा युनियन आक्रमक!

## रस्त्याच्या दुतर्फा हातगाड्यांचा विळखा



जन सम्राट टाईम्स

**कल्याण| प्रतिनिधी:** कल्याण जवळील मोहने परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांचा वाढता विळखा आता नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत असून रिक्षाचालक संघटनाही याविरोधात आक्रमक झाल्या आहेत. मोहने मुख्य बाजारपेठ ते स्टेशन परिसरात रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात हातगाड्या, भाजी विक्रेते, फळ विक्रेते, आईस्क्रीम विक्रेते, भेळपुरी, मोमोज आणि शोरमा विक्रेत्यांनी अतिक्रमण केल्याने परिसरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. विशेषतः सकाळ आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत या परिसरातून मार्ग काढणे नागरिकांसाठी धोकादायक बनले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हातगाड्या उभ्या राहत असल्याने वाहनांसाठी जागाच उरत नाही. परिणामी सतत वाहतूक कोंडी होत असून रिक्षाचालक, नोकरदार, विद्यार्थी, महिला आणि वृद्ध नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर रिक्षा चालक-मालक असोसिएशन, आंबिवली-मोहने विभागाचे अध्यक्ष शिवाजी पाटील यांनी थेट पालिकेचे सहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी यांना निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली आहे. “अनधिकृत फेरीवाल्यांमुळे रस्ते अरुंद झाले असून रिक्षा वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही,” असा आरोप त्यांनी केला आहे. स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अनेक ठिकाणी फेरीवाल्यांनी कायमस्वरूपी ठाण मांडल्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालताना जीव मुठीत धरावा लागत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. शाळा-कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांनाही याचा मोठा फटका बसत आहे. रिक्षाचालक संघटनेच्या म्हणण्यानुसार, अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाई करण्यासाठी स्वतंत्र पथक असतानाही प्रत्यक्षात कोणतीही प्रभावी मोहीम राबवली जात नाही.

त्यामुळे दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत असून भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, परिसरातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनीही प्रशासनाने तातडीने दखल घेऊन रस्ते मोकळे करावेत, अशी मागणी केली आहे. “फेरीवाल्यांमुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला असून आपत्कालीन सेवा वाहनांनाही मार्ग काढणे कठीण होत आहे,” अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली. मोहने परिसरातील वाढत्या अतिक्रमणामुळे स्थानिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून, पालिका प्रशासन आता नेमकी कोणती भूमिका घेते आणि अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# २० मेच्या मेडिकल संपाला नागरिकांचा तीव्र विरोध!

## मेडिकल दुकानांचे परवाने रद्द करा

जन सम्राट टाईम्स

**कल्याण :** २० मे रोजी पुकारण्यात आलेल्या ऑल इंडिया मेडिकल असोसिएशनच्या देशव्यापी मेडिकल बंदला नागरिकांकडून तीव्र विरोध व्यक्त करण्यात येत आहे. अत्यावश्यक सेवेमध्ये गणल्या जाणाऱ्या मेडिकल सेवा बंद ठेवून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरणे चुकीचे असल्याची संतप्त प्रतिक्रिया विविध स्तरांतून उमटत आहे. संपात सहभागी होणाऱ्या मेडिकल दुकानांवर शासनाने कठोर कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करावेत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. सध्या देशात वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि आर्थिक तणावामुळे सामान्य नागरिक आधीच अडचणीत सापडले आहेत. त्यातच मेडिकल दुकानांच्या बंदमुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसमोर मोठे संकट उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः डायबिटीस, बीपी, हृदयरोग, किडनी विकार यांसारख्या गंभीर आजारांवरील नियमित औषधे घेणाऱ्या रुग्णांना याचा मोठा फटका बसू शकतो. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वर्षभर मोठ्या प्रमाणात नफा कमावणारे काही मेडिकल चालक आता स्वतःच्या आर्थिक हितासाठी संपाचा मार्ग स्वीकारत असून रुग्णांच्या जीवाशी खेळ करत आहेत. औषधांची विक्री अनेकदा मूळ किमतीपेक्षा दोनशे ते तीनशे टक्के अधिक दराने केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. औषध उत्पादक कंपन्या आणि मेडिकल दुकानदार यांच्यातील संगनमतामुळे ग्राहकांना जादा किंमत मोजावी लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याशिवाय, स्वस्त आणि परिणामकारक जेनेरिक औषधांना अनेक मेडिकल दुकानदारांकडून



जाणीवपूर्वक विरोध केला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अनेक दुकानांमध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध करून दिली जात नसल्याने सर्वसामान्य रुग्णांना महागडी ब्रँडेड औषधे खरेदी करण्याशिवाय पर्याय राहत नसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. काही नागरिकांनी मेडिकल व्यवसायातील अनियमिततेकडेही लक्ष वेधले आहे.

### दोषींवर कारवाई करण्याची मागणी

प्रत्येक मेडिकल दुकानात पात्र फार्मासिस्ट असणे बंधनकारक असतानाही अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. एकाच परवान्यावर अनेक दुकाने चालवली जात असल्याचे तसेच काही ठिकाणी औषधविषयक शिक्षण नसलेल्या व्यक्तींकडून औषध विक्री केली जात असल्याचेही सांगण्यात आले. याशिवाय काही भागांत बंदी असलेल्या सेक्सवर्धक गोळ्या आणि गर्भपाताच्या औषधांची बेकायदेशीर विक्री होत असल्याचे गंभीर आरोप नागरिकांनी केले असून या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# एमएनजीएल गॅस पाइपलाइन कामावरून संताप

## ९ कोटी ७२ लाख रुपये जमा न करताच रस्ते खोदल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहरात एमएनजीएल (MGL) कंपनीमार्फत सुरू असलेल्या सीएनजी आणि पीएनजी गॅस पाइपलाइन कामांवरून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महानगरपालिका प्रशासनाची आवश्यक रक्कम जमा न करताच शहरातील विविध भागांमध्ये रस्ते खोदून गॅस पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी भाजप कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांकडे तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील आठ प्रभागांमध्ये एमएनजीएलकडून गॅस पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी महानगरपालिकेकडे सुमारे ९ कोटी ७२ लाख रुपये जमा करणे आवश्यक होते. मात्र संबंधित रक्कम जमा न करताच रस्ते खोदण्यास सुरुवात करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. शहरातील अनेक भागांमध्ये रस्ते खोदून अर्धवट अवस्थेत काम सोडून दिल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून वाहतूक धोकादायक बनली आहे. पादचारी, दुचाकीस्वार आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. पावसाळा तोंडावर आला असताना ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सचिन काळभोर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महानगरपालिका प्रशासनाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. एमएनजीएल कंपनीने तातडीने ९ कोटी ७२ लाख रुपयांची रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी. अन्यथा संबंधित गॅस पाइपलाइनचे काम तत्काळ बंद करण्यात यावे तसेच संबंधित ठेकेदार आणि कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच, शहरातील नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करून रस्ते पूर्ववत करण्याची मागणीही करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी रस्ते खोदून तसेच सोडण्यात आल्यामुळे वाहतूक कोंडी, धूळ आणि अस्वच्छतेच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे. दरम्यान, महानगरपालिका प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी आणि कामाच्या नियमांचे उल्लंघन झाले असल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडूनही होत आहे. शहरातील विकासकामांच्या नावाखाली नागरिकांना त्रास होऊ नये आणि सार्वजनिक सुविधांचे नुकसान टाळले जावे, यासाठी प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# धुळे लळिंग टोल नाक्यावर वाहनांना टोलमुक्तची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धुळे |** धुळे येथील लळिंग टोल नाक्यावर सामाजिक न्यायासाठी कार्य करणाऱ्या संघटना, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि विविध सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय असलेल्या नेत्यांच्या वाहनांना टोलमुक्त प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेना, धुळे जिल्हा युनिटच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी टोल प्रशासनाला निवेदन सादर केले. ऑल इंडिया पँथर सेनेचे धुळे जिल्हाध्यक्ष सागर भाऊ मोहिते यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, राज्यात किंवा जिल्ह्यात कुठेही अन्याय, अत्याचार, अपघात किंवा गंभीर सामाजिक घटना घडल्यास सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी धाव घ्यावी लागते. पीडितांना मदत करणे, प्रशासनाशी समन्वय साधणे तसेच नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने दौरे करावे लागत असल्याने सामाजिक कार्यकर्त्यांवर आर्थिक ताण येत आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार हे महाराष्ट्रभर सामाजिक प्रश्नांसाठी सातत्याने दौरे करीत असतात. त्यामुळे त्यांचे वाहन तसेच संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांच्या वाहनांना टोलमुक्त सुविधा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांना ओळखपत्र (ID Card) देण्यात आले असून संबंधित ओळखपत्र पाहून वाहनांना विनाअडथळा टोलमधून मार्ग देण्यात यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ऑल इंडिया पँथर सेनेने केवळ आपल्या संघटनेसाठीच नव्हे, तर अन्यायाविरोधात लढणाऱ्या सर्व सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी काम करणाऱ्या नेत्यांनाही ही सवलत लागू करावी, अशी व्यापक मागणी केली आहे.

# शिवरायांच्या महाराष्ट्रातील शिवसेनेचा “विकास व लोककल्याणाचा हिंदवी विचारांचा भगवा युवा झंझावात”

**म**हाराष्ट्राच्या विकासाचा व्यापक आराखडा शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी महाराष्ट्रातील २२ जिल्हे आणि सुमारे १०० विधानसभा मतदारसंघांचा सखोल आढावा घेत संघटनात्मक तसेच विकासात्मक कामांना गती देण्याचे व्यापक कार्य हाती घेतले आहे. ग्रामीण भागापासून ते महानगरांपर्यंत प्रत्येक मतदारसंघाच्या गरजा, स्थानिक समस्या, रोजगार, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि औद्योगिक विकास यांचा स्वतंत्र अभ्यास करून “विकास केंद्रित राजकारण” हेच शिवसेनेचे ध्येय असल्याचे ते दाखवून देत आहेत. संघटन मजबुतीसाठी प्रभावी मोहीम

राजकीय संघटन केवळ निवडणुकांपुरते मर्यादित न ठेवता जनतेशी सातत्याने जोडलेले राहण्यासाठी शिवसेनेने एसआयआर (Special Intensive Revision) अभियानावर विशेष भर दिला आहे. बीएलए (Booth Level Agent) नियुक्त्यांद्वारे बूथ पातळीपर्यंत सक्षम संघटन उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. प्रत्येक कार्यकर्ता हा जनतेचा प्रतिनिधी म्हणून काम करेल, अशी मजबूत रचना उभारण्याचा प्रयत्न शिवसेनेकडून होत आहे.

जिल्हानिहाय विकासाचे स्पष्ट व्हिजन


प्रत्येक जिल्ह्याच्या भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक गरजा वेगळ्या आहेत, याची जाणीव ठेवून नागरी व मूलभूत सुविधा विकासाचे स्वतंत्र व्हिजन तयार करण्यात आले आहे.

- ग्रामीण रस्ते, पाणीपुरवठा आणि सिंचन प्रकल्प
- शहरांमध्ये वाहतूक सुलभता, मेट्रो, आरोग्य सुविधा आणि स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर
- शेतकऱ्यांसाठी बाजारपेठ व प्रक्रिया उद्योग
- युवकांसाठी कौशल्य विकास केंद्रे
- महिलांसाठी स्वावलंबन आणि बचत गटांना चालना

अशा विविध योजनांद्वारे विकासाचा समतोल साधण्याचे काम सुरू आहे. लोककल्याणकारी योजनांचा शेवटच्या घटकापर्यंत लाभ राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध लोकहितकारी योजना केवळ कागदावर न राहता त्या शेवटच्या गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी शिवसेनेचा धडक कार्यक्रम राबविला जात आहे.

शेतकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, कष्टकरी आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी स्थानिक पातळीवर विशेष मोहीम सुरू आहे. शासन आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून शिवसेना कार्यरत असल्याचे या उपक्रमातून दिसून येते. युवकांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम करण्याचा संकल्प

*महाराष्ट्राच्या राजकारणात विकास, लोककल्याण आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून पुढे जाणाऱ्या शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आज युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे नाव विशेषत्वाने घेतले जातेय. पक्षातील सर्व ज्येष्ठ मंत्री, आमदार, खासदार, लोकप्रतिनिधि, पदाधिकारी, सहकारी, महिला सेना व युवा वर्गाला सोबत घेऊन राज्याच्या कानाकोपऱ्यात “हिंदवी विचारांचा भगवा झंझावात” निर्माण करत शिवसेना नव्या उर्जेने आणि नव्या दृष्टिकोनाने पुढे जात असल्याचे चित्र आज महाराष्ट्रात दिसत आहे.*




आजच्या जागतिक युगात शिक्षण आणि कौशल्य विकास हीच खरी ताकद आहे. त्यामुळे परदेशातील नामांकित विद्यापीठांचे विविध अभ्यासक्रम महाराष्ट्रात उपलब्ध करून देण्याच्या संकल्पनेला डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्राधान्य दिले आहे. यामुळे महाराष्ट्रातील युवकांना परदेशात न जाता जागतिक दर्जाचे शिक्षण,

**दिनेश शिंदे**
राष्ट्रीय सह समन्वयक व प्रसार माध्यम समन्वयक शिवसेना पक्ष

संशोधन आणि तांत्रिक कौशल्ये आपल्या राज्यातच मिळू शकतील. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, हेल्थ टेक्नॉलॉजी, व्यवस्थापन आणि उद्योजकता यांसारख्या क्षेत्रांमध्ये युवकांना सक्षम करून रोजगार आणि स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्याचे मोठे उद्दिष्ट यामागे आहे.

### आरोग्य क्षेत्रात नव्या संकल्पना

आरोग्य क्षेत्रात आधुनिक आणि सर्वसमावेशक सुविधा निर्माण करण्यासाठीही विशेष प्रयत्न सुरू आहेत. ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा, डिजिटल हेल्थ नेटवर्क, आधुनिक रुग्णालये, मातृत्व आणि बालसंगोपन सुविधा तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य व्यवस्थेवर भर देण्यात येत आहे. कोविड काळात जनतेसाठी अहोरात्र काम केलेल्या ना. एकनाथ शिंदेंच्या समाजोपयोगी नेतृत्वाने आता दीर्घकालीन आरोग्य व्यवस्थेचा मजबूत पाया घालण्याचा निर्धार केला आहे.

### औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती

महाराष्ट्र देशाची आर्थिक राजधानी मानला जातो. राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून रोजगारनिर्मिती वाढविण्यावर शिवसेनेचे विशेष लक्ष आहे. एमआयडीसी क्षेत्रांचा विस्तार, नवीन उद्योगधंद्यांना प्रोत्साहन, स्टार्टअप्सना सहाय्य, लॉजिस्टिक हब, हरित ऊर्जा प्रकल्प आणि पायाभूत सुविधा सुधारणा यांमुळे महाराष्ट्राला उद्योगस्नेही राज्य म्हणून अधिक सक्षम बनविण्याचा प्रयत्न सुरू आहे. सामाजिक समन्वय आणि सांस्कृतिक प्रगती शिवसेनेचे राजकारण हे केवळ सत्ता केंद्रित नसून समाजातील सर्व घटकांना एकत्र घेऊन प्रगती साधण्याच्या विचारावर आधारित असल्याचे दिसते. मराठी अस्मिता जपत सर्व समाजघटकांमध्ये सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. युवक, महिला, शेतकरी, कामगार, व्यावसायिक, कलाकार आणि विविध समाजघटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून “समृद्ध आणि सक्षम महाराष्ट्र” घडविण्याची दिशा शिवसेना देत आहे.

### विकास आणि जनविश्वासाचे नवे समीकरण

शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथ शिंदे यांच्या यशस्वी नेतृत्वाखाली शिवसेनेने विकासात्मक, सकारात्मक आणि लोककल्याणकारी राजकारणाचा नवा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. जनतेच्या प्रश्नांशी थेट संवाद, प्रशासनातील गतिमान निर्णयप्रक्रिया आणि विकासाला सर्वोच्च प्राधान्य या त्रिसूत्रीमुळे शिवसेना आणि महाराष्ट्रातील जनता यांच्यात एक अतुलनीय विश्वासाचे नाते निर्माण होताना दिसत आहे.

**“भगवा झंझावात” ही केवळ राजकीय घोषणा नसून विकास, विश्वास आणि जनसेवेच्या माध्यमातून महाराष्ट्राला नवी दिशा देण्याचा व्यापक संकल्प आहे.**

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## मणिबेन एम. पी. शाह महिला महाविद्यालयाची इंधन बचत जनजागृती रॅली

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इंधन तुटवड्याची शक्यता आणि वाढती महागाई लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना इंधन बचत, स्वदेशीचा स्वीकार आणि सार्वजनिक वाहतुकीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले आहे. या राष्ट्रीय आवाहनाला प्रतिसाद देत माटुंगा येथील सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला



महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी जनजागृती रॅलीचे आयोजन केले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि राष्ट्रीय छात्रसेना (NCC) विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या रॅलीमध्ये विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत समाजात ऊर्जा बचत आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचवला. “इंधन वाचवा”, “स्वदेशी स्वीकारा”, “सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा”, “ऊर्जा बचत हीच देशसेवा” तसेच “अनावश्यक परदेश प्रवास टाळा” अशा विविध संदेशांचे फलक आणि बॅनर्स हातात घेऊन विद्यार्थिनींनी महाविद्यालय परिसरातून महेश्वरी उद्यान, खालसा महाविद्यालय आणि डॉन बॉस्को शाळा परिसरापर्यंत जनजागृती फेरी काढली. रॅलीदरम्यान विद्यार्थिनींनी नागरिकांना पेट्रोल-डिझेल बचतीचे महत्त्व, पर्यावरण रक्षणाची गरज आणि राष्ट्रीय जबाबदारी याविषयी जागरूक केले. घोषणाबाजी आणि शिस्तबद्ध सहभागामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते. रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांनीही विद्यार्थिनींच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाविद्यालयाच्या प्राचार्या अर्चना पत्की यांनी विद्यार्थिनींच्या सामाजिक जाणीवा आणि राष्ट्रीय बांधिलकीचे विशेष कौतुक केले. विद्यार्थिनींमध्ये सामाजिक संवेदनशीलता, राष्ट्रीय कर्तव्यभावना आणि पर्यावरण संरक्षणाची जाणीव विकसित होणे काळाची गरज आहे,” असे त्या म्हणाल्या. सुट्टीचा कालावधी असतानाही विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.